# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २५.११.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २४/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २७८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,७७,३५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२४/११/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण १९ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ५२६.१४ लिटर दारू असा एकुण ६२,२७५/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**ई सी ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. २४/११/२०२२ रोजी फिर्यादी शेख शफीयोदीन शेख अमिरोदीन वय ३६ वर्ष व्य.नौकरी पोना/८५८ ने दहशतवाद विरोधी पथक हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३२८,२७२,२७३,१८८ भादवी सहकलम 26(2)(i),26(2)(iv),27(2)(e),30(2)(अ),59 **अन्न सुरक्षा अधि.**अन्वये गुन्हा नोंद असुन यातील आरोपीतांनी महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला सुंगंधीत पानमसाला तंबाखु स्वताच्या फायदयासाठी बेकायदेशीर रित्या गाडीवर विक्रीसाठी घेवुन जात असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल असुन आरोपीकडुन एकुन ६०,४०० रू चा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे व पुढील तपास हिंगोली शहर पोलीस करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल :—**दिनांक २४/११/२०२२ रोजी फिर्यादी विनोद विठठलराव अतकुरकर वय ४८ वर्ष व्य.वैदयकीय अधिकारी,रा अंबिका नगर नांदेड ह.मु प्रा.आ.केंद्र डोंगरकडा यांचे फिर्यादी वरून पोस्टे आ.बाळापुर येथे कलम २७९,३०४(अ),३३७,३३८,४२७ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन डोंगरकडा येथील रूग्णवाहीका मध्ये जखमी ईसम व त्याचे नातेवाईकाना घेवुन जात असतांना हिवरा पाटी जवळ आला असता नांदेड कडुन येणारे टिपर हायवा क्र एमएच ४०सिडी५५५९ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन रूग्णवाहीकेला समोरा समोर जोराची धडक देवुन मयताचे मरणास कारणीभुत होवुन रूग्णवाहिकेतील इतर नातेवाईकांना गंभीर जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.

**किरकोळ दुखापत:**—दिनांक २४/११/२०२२ रोजी पोस्टे बाळापुर ०२ व पोस्टे हटटा येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०३ ठिकाणी कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भादंवि प्रमाणे गुन्हे नोंद असुन पुढील तपास पोलीस करत आहेत.